# लोक महाविद्यालय, वर्धा

## समाजशास्त्र विभाग

## <u>अहवाल सत्र 2015 -16</u>

लोक महाविद्यालय, वर्धा सत्र 2015-16 या शैक्षणिक वर्षात समाजशास्त्र विभागांतर्गत समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापन करण्याकरिता दिनांक 9 सप्टेंबर 2015 महिन्यामध्ये बैठक घेण्यात आली. सदरहु बैठकीला समाजशास्त्र विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. सदरहु उपस्थित विदयार्थ्यांना मा.सौ.पुष्पा तायडे प्राचार्या लोक महाविद्यालय वर्धा यांनी मार्गदर्शन केले. बैठकीला उपस्थित विद्यार्थ्यांमधुन 11 सदस्यांची निवड करुन समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. यात समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून प्रितम पाटील या विद्यार्थ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सदरहु बैठकीला समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

समाजशास्त्र अभ्यास मंडळाव्दारे समाजाशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा 'पारले जी' कंपनी नागपुर या ठिकाणी नेण्यात आला. अभ्यास दौरा मध्ये समाजशास्त्र विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग सहभागी झाले होते. आधुनिक समाजामध्ये औद्योगिक क्षेत्रात नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन जी प्रगती घडवून आणलेली आहे, याची जाणिव विद्यार्थ्यांना या भेटीमध्ये झाली.

तसेच समाजशास्त्राच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे सेमीनार आयोजीत करण्यात आले. त्याकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.पुष्पा तायडे मॅडम, प्रा.डेहणे मॅडम प्रा.उमाटे मॅडम व प्रा.पंचभाई मॅडम यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

प्रा.जयश्री डेहणे
समाजशास्त्र विभाग,
लोक महाविद्यालय, वर्धा